महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण
जनसंपर्क विभाग
कक्ष क्र. १९/२० तळ मजला, गृहनिर्माण भवन, कला नगर, वांद्रे पूर्व, मुंबई – ४०००५१.
☎ ०२२-६६४०५०६६/७७. ईमेल ✉: cpromhadaoffice@gmail.com

==========

जावक क्रमांक – ८७/३४३६८२७ दिनांक :- ११ सप्टेंबर, २०२६

प्रसिद्धिपत्रक

कोंकण मंडळाच्या शिरढोण व खोणी येथील प्रधानमंत्री आवास योजनेतील सदनिकांचे सेवाशुल्क कमी

लाभार्थ्यांच्या मागणीची उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी संजीव जयस्वाल यांनी घेतली दखल

मुंबई, दि. ११ सप्टेंबर, २०२६ : म्हाडाच्या कोंकण गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळातर्फे कल्याण तालुका, जिल्हा ठाणे येथील मौजे शिरढोण व मौजे खोणी येथे प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत उभारण्यात आलेल्या सदनिकांच्या लाभार्थ्यांना दिलासा देत म्हाडाने सेवाशुल्कात कपात करण्याचा निर्णय घेतला आहे. सुधारित सेवाशुल्क १ ऑक्टोबर २०२६ पासून लागू करण्यात येणार आहे.

म्हाडाचे उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी श्री संजीव जयस्वाल यांनी दिनांक २१ मे, २०२६ रोजी मौजे शिरढोण व मौजे खोणी येथील प्रधानमंत्री आवास योजनेच्या प्रकल्पांची स्थळ पाहणी केली होती. यावेळी योजनेतील लाभार्थ्यांनी सदनिकांसाठी आकारण्यात येणारे सेवाशुल्क कमी करण्याची विनंती केली होती. लाभार्थ्यांच्या या मागणीची दखल घेत श्री जयस्वाल यांनी सेवाशुल्कात कपात करण्याचा निर्णय घेतला आहे.

मौजे खोणी, तालुका कल्याण, जिल्हा ठाणे येथील प्रधानमंत्री आवास योजनेतील सदनिकांसाठी सध्या आकारण्यात येणारे ₹२,४२२ प्रति महिना प्रति सदनिका सेवाशुल्क आता ₹१,८०० प्रति महिना प्रति सदनिका करण्यात आले आहे.

तसेच, मौजे शिरढोण, तालुका कल्याण, जिल्हा ठाणे येथील प्रधानमंत्री आवास योजनेतील सदनिकांसाठी सध्या आकारण्यात येणारे ₹१,९७९ प्रति महिना प्रति सदनिका सेवाशुल्क आता ₹१,७०० प्रति महिना प्रति सदनिका करण्यात आले आहे.

या निर्णयामुळे खोणी येथील लाभार्थ्यांना दरमहा ₹६२२, तर शिरढोण येथील लाभार्थ्यांना दरमहा ₹२७९ इतका आर्थिक दिलासा मिळणार आहे. लाभार्थ्यांच्या मागणीची सकारात्मक दखल घेत सेवाशुल्कात करण्यात आलेली ही कपात प्रधानमंत्री आवास योजनेतील नागरिकांसाठी दिलासादायक ठरणार आहे.

खोणी येथील गृहनिर्माण प्रकल्पात अत्यल्प व अल्प उत्पन्न गटासाठी एकूण ७,१७४ निवासी सदनिका व १५२ दुकाने उभारण्यात येत आहेत. सन २०१८ मध्ये २,०३२ सदनिका, सन २०२१ मध्ये २,०१६ सदनिका आणि सन २०२५ मध्ये १,०१२ सदनिकांची सोडतीद्वारे विक्री करण्यात आली आहे. तसेच शिरढोण येथील गृहनिर्माण प्रकल्पात अत्यल्प व अल्प उत्पन्न गटासाठी एकूण १८,६९२ निवासी सदनिका आणि ३४२ दुकाने उभारण्याचे काम सुरू आहे. या प्रकल्पातील अत्यल्प उत्पन्न गटातील १,९०५ सदनिका सन २०१८ मध्ये तर ५,२२७ सदनिका सन २०२५ मध्ये सोडतीद्वारे उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.

###

स्वाक्षरीत/-
(वैशाली गडपाले)
मुख्य जनसंपर्क अधिकारी / म्हाडा

सोशल मिडियावर आम्हाला फॉलो करा :

@mhadaofficial @mhadaofficial @mhadaofficial @mhadaofficial